**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education**
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/1603
पुणे ४११ ००४.
दिनांक – ~~२३~~ 25 एप्रिल २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क.र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३
६. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/११३१, पुणे ४ दि.१३/३/२०२४
७. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, महाराष्ट्र यांचे पत्र.
८.क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१२५६, पुणे ४ दि.२१/३/२०२४
८. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१३०५, पुणे ४ दि.२६/३/२०२४
९. शाळांचे ईमेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज दि.३०/३/२०२४.
१०.क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१३६६,पुणे ४ दि.०२/४/२०२४
११. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१४८५,पुणे ४ दि.१२/४/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार,टंचाईग्रस्त/दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही विद्यार्थी/पालकांच्या आधार संलग्न Bank account मध्येच राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ.१०वीसाठी 'http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि इ.१२वीसाठी 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. दि.१९ एप्रिल, २०२४ पर्यंत माहिती सादर करण्याची पाचवी मुदतवाढ देण्यात आली होती.

मुदतवाढीच्या अनुषंगाने, ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी यापूर्वी माहिती सादर केली आहे, तथापि मुदत संपुष्टात आल्याने ज्या विद्यार्थ्यांची माहिती अप्राप्त असल्याने सादर केली नाही, अशी माहिती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती online द्वारे भरण्यासाठी, दि.३० एप्रिल, २०२४ पर्यंत सहावी व अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. याबाबत संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रपत्र'अ' व प्रपत्र'ब' प्रमाणपत्रासह संबंधित विभागीय मंडळात जमा करायचे आहेत, राज्यमंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत, online द्वारे प्राप्त होणा-या माहितीद्वारेच राज्यमंडळ स्तरावरुन परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, आपल्या कार्यक्षेतील सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी –
१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा.शिक्षण संचालक (योजना), मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
४. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर / अमरावती / नाशिक / लातूर / कोल्हापूर / बृहन्मुंबई –
५. शिक्षणाधिकारी(माध्यमिक)- आधार संलग्न Bank account मध्येच परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येणार असल्याचे सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.
६. श्रीमती योगिता देशमुख, कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

पृष्ठांकन क्र.अविमं/माप/१९४
दिनांक -25/04/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य ,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/ क.म.वि.,
अमरावती विभाग, अमरावती

उपरोक्त पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार योग्य ती नोंद घेवून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या निदर्शनास आणून दयावे.

(तेजराव काळे)
विभागीय सहसचिव ,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती